# महत्त्वाचे

## 'कॉर्पोरेट गव्हर्नन्स' पुस्तकाचे प्रकाशन



**नागपूर :** सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर कार्पोरेट गव्हर्नन्सचे अध्यक्ष प्रो. अरुणकुमार रथ यांच्या कॉर्पोरेट गव्हर्नन्स या पुस्तकाचे प्रकाशन आयआयएम, नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकाबद्दल माहिती देताना प्रा. रथ यांनी, माझ्या संवादाचे हे पुस्तक फलित आहे. त्यात निर्णय प्रक्रियेत माझा सहभाग, दुसरे, कंपनीचे संचालक आणि अधिकारी यांच्यासाठी माझे प्रशिक्षण सत्र, दोन्हीसाठी भारतीय आणि जागतिक सहभाग तिसरे, व्यवस्थापनाशी माझे वर्ग संवाद यांचा समावेश असल्याचे सांगितले. यावेळी प्रो. राजीव अग्रवाल, डॉ. मंगेश नागराजन, प्रो. दीपमाला बघेल, डॉ. प्रशांत गुप्ता आदी उपस्थित होते.